(131)

प/५

प/५

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
कामगार विभाग,२रा मजला,
प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
संदर्भ क्र. कामगार/अ/ ३०१९६
दिनांक : २६.१०.२००८

## परिपत्रक

विषय : कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत.
संदर्भ : मु.का.परिपत्रक क्र. कामगार/अ/२२६९८ दि. ३०.०७.२००४.
*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कंत्राटी कामगारांचे वेतन पुनर्निधारणबाबत महाराष्ट्र शासनाच्या शासकीय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार क्र.किवेअ-१०२००२/८८/कामगार-७ दि.३०.०६.२००४ ला अनुसरुन या कार्यालयाने त्याबाबतची अंमलबजावणी दि.३०.०६.२००४ पासून करण्याच्या सूचना वरील संदर्भांकित परिपत्रकान्वये निर्गमित केल्या होत्या.

तथापि, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.मावि/२००४/किवेअ-विभ/कार्यालय १० दि.२४.०९.२००४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुसूचित उद्योगाकरिता किमान वेतनाचे पुनर्निधारण केलेल्या दि. ३०.०६.२००४ च्या अधिसूचनेस मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. ३०.०८.२००४ च्या आदेशाद्वारे स्थगिती दिली असून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत या अनुसूचित उद्योगांतील कंत्राटी कामगारांना तत्पूर्वीच्या म्हणजे दि.०६.१२.१९९६ च्या अधिसूचनेन्वये निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या मूळ दराच्या अंमलबजावणीच्या सूचनांचे पालन करावे व विशेष भत्ता दराची (६ महिने करिता) अंमलबजावणी कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकाप्रमाणे करावी असे कळविले आहे. कामगार आयुक्त, मुंबई यांच्या दि. २४.०९.२००४ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तरी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी दर निर्देशित केल्याप्रमाणे कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दराची अंमलबजावणी करावी.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

W.O.
9|x|

प्रत :

१) सर्व क्षेत्रिय अधिकारी / कार्यकारी अभियंतापर्यंत व भांडार अधिकारी
२) उप मुख्य औ.सं.अधिकारी / औद्योगिक संबंध अधिकारी / कल्याण अधिकारी / कामगार अधिकारी

D:\Meenal\Kam Alkantri kam\kantrie paritrak.doc 2

C.E. MAY KINDLY SEE